ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# “ शिक्षक शिक्षणाची सद्यस्थिती ”

**प्रा. बहिरट सारिका**
**असि.प्राध्यापक**
**अध्यापक महाविद्यालय,**
**अरण्येश्वर ,पुणे.**


**प्रा. खटाटे प्राजक्ता**
**असि.प्राध्यापक**
**अध्यापक महाविद्यालय,**
**अरण्येश्वर,पुणे.**

## प्रस्तावना :—

अध्ययन—अध्यापनाच्या क्षेत्रात ज्ञानाचा प्रस्फोट झाल्यामुळे अनेक फायदे झाले मात्र त्याचबरोबर विविध समस्यांनाही तोंड द्यावे लागत आहे. जागतिकीकरणामुळे अध्ययन—अध्यापनाचे महत्व लक्षात यायला लागले, त्याचबरोबर शिक्षक, संशोधक आणि जनसंपर्क माध्यमांकडून अपेक्षाही वाढल्या असे लक्षात येते. यामुळे पुढील काळाचा विचार करता शिक्षक शिक्षणात आवश्यक ते बदल करणे जरूरीचे आहे.

पूर्वी शिक्षक शिक्षण ही संकल्पना शिक्षक प्रशिक्षणासाठी वापरली जात होती. परंतु या संकल्पनेनुसार केवळ वर्गाध्यापनाची कौशल्ये शिक्षकांमध्ये विकसित केली जात होती. या शिक्षणाची जागा आता शिक्षक शिक्षणाने घेतली आणि त्याचा अधिक व्यापक स्वरूपात विचार करण्यात येऊ लागला. शिक्षक प्रशिक्षणात समाविष्ट सर्व प्रक्रिया शिक्षकाला इथे कराव्याच लागतील परंतू त्याचबरोबर त्याने स्वनिर्णय घ्यावा, स्वत:चा व्यावसायिक विकास करण्यासाठी स्वयंप्रेरणेने प्रेरित व्हावे आणि एक जागरूक शिक्षक म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करावी अशी अपेक्षा आहे. या अर्थाने शिक्षक शिक्षण हे शिक्षक प्रशिक्षणापेक्षा व्यापक आहे.

**शिक्षक शिक्षणात शिक्षकाची भूमिका :—**




**शिक्षक शिक्षणाची सद्यस्थिती :—** भारताच्या आधुनिक गरजा पूर्ण करण्याचे कार्य प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांनी करणे अगत्याचे आहे. सामाजिक स्थित्यंतरांचा भविष्यवेध, विलक्षण वेगाने वाढणारी व क्षणात उपलब्ध होणारी माहिती, काळानुरूप बदलणारी शैक्षणिक धोरणे व अभ्यासक्रम, शिक्षण शिक्षणाशी संबंधित अन्य विद्याशाखांमधील आणि प्रत्यक्ष शिक्षणशास्त्रातील प्रगती, शिक्षक शिक्षणाचे राष्ट्रीय पातळीवरील धोरण, कार्यपद्धती आणि अभ्यासक्रम कार्यपद्धती अशा विविध बाबी विचारात घेऊन शिक्षक शिक्षणाचा अभ्यासक्रम व त्यांच्या अंमलबजावणीची दिशा ठरविणे आवश्यक आहे.

## शिक्षक शिक्षणाची सद्यस्थिती –

१. बी.एड अभ्यासक्रमात **६०VDds** भारांश प्रात्यक्षिक कार्य व ४० VDds भारांश सैद्धांतिक भागाला देण्यात आले आहे. असे असूनही अभ्यासक्रम अंमलबजावणीत उणीवा राहत असल्याने याचा परिणाम शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेवर झालेला दिसून येतो

२. बी.एड अभ्यासक्रमात शालेय विषयांबरोबर आधुनिक माहिती संप्रेषण तंत्रज्ञान अनुदेशन प्रणाली, शैक्षणिक संशोधन,पर्यावरण शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन या विषयांचे तसेच मेंदू आधारित शिक्षण, ज्ञानरचनावाद, संगणक सहाय्यित अध्ययन यासारख्या नवीन घटकांचा समावेश आहे.

३. बी.एड अभ्यासक्रम राबविणा—या महाविद्यालयांची संख्या वाढलेली आहे. त्यात ग्रामीण भागात शिक्षक शिक्षण देणा—या महाविद्यालयाची संख्या शहरी भागातील शिक्षक शिक्षण देणा—या महाविद्यालयाच्या तुलनेत जास्त आहे.

४. शिक्षक शिक्षण देणा—या महाविद्यालयाची वाढता संख्येमुळे बहुतांश महाविद्यालयातील जागा **(पटनोंदणी )** रिकाम्या असलेले दिसतात.

५. बी.एड महाविद्यालयात पटनोंदणीमध्ये **(Enrolment)** असमानता दिसून येते. काही वेळेस महाविद्यालयांमध्ये पटनोंदणी **(प्रेवशित विद्यार्थी संख्या)** पूर्ण झालेली असूनही प्रत्यक्ष वर्गात हजर असणारे विद्यार्थी संख्या यात मात्र तफावत आढळते.

६. विनाअनुदानित/खाजगी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये बी.एड अभ्यासक्रमासाठी आकारल्या जाणा—या शुल्कात भिन्नता दिसून येते.

७. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये पूर्ण अर्हता प्राप्त प्राध्यापकाची उणीव असल्याचे दिसते.

८. बी.एड अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया ही दीर्घकाळ **(२—३ महिने)** चालणारी आहे. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कमी कालावधी **(७—८ महिने)** मिळतो. त्याचा परिणाम अभ्यासक्रम राबविताना अडचणी येण्याची शक्यता निर्माण होते.

९. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा—या विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने कमी गुण असलेलया विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळत आहे. त्यामुळे याचा परिणाम शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेवर झालेला दिसून येतो.

१०. शिक्षण प्रशिक्षण पदवी अभ्यासक्रम विद्यापीठ स्तरावर तयार करून राबविला जातो. या प्रक्रियेत शालेय स्तरावरील अभ्यासक्रम व पाठयपुस्तक तयार करणा—या संस्थांचा सहभाग नाही.

**शिक्षक शिक्षणातील आव्हाने :—** २०२० च्या सशक्त महासत्तेसाठी भारताला शिक्षणात बदल करणे अपरिहार्य आहे. जागतिकीकरण आधुनिकीकरण यामुळे भारतात अनेक परदेशी देशांतील विद्यापीठे व महाविद्यालये सुरू केली आहेत. अशा परिस्थितींमध्ये या सर्व बदलत्या गरजां पूर्ण करण्यासाठी व यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये आजच्या शिक्षकामध्ये असणे आवश्यक आहे. शिक्षक शिक्षण महाविद्यालयातून बाहेर पडणारे शिक्षक जर गुणवत्तापूर्ण असतील तरच आजच्या काळातील आव्हानांना ते यशस्वीरित्या सामोरे जाऊ शकतील आणि समाजाच्या पर्यायाने देशाच्या गरजा पूर्ण करू शकतील. त्यासाठी शिक्षक शिक्षण महाविद्यालयांनी पुढील आव्हानांची दखल घेणे व त्यावर उपाय करणे आवश्यक आहे.

| |
|---|
| १. ज्ञानाचा व माहितीचा विस्फोट |
| २. शिक्षणात नवीन विचारप्रवाहांचा समावेश |
| ३. महिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वाढता वापर |
| ४. गुणवत्तापूर्ण शिक्षणातील समस्या |
| ५. शिक्षक शिक्षण महाविद्यालयांची वाढती संख्या |
| ६. शिक्षणाचे जागतिकीकरण |
| ७. मूल्याशिक्षणाची गरज |

१. **ज्ञानाचा /माहितीचा विस्फोट** — जगतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे तसेच तंत्रज्ञानाच्या वापराने नवीन ज्ञानाची व माहितीची भर पडत आहे. त्यामुळे विषयांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

२. **शिक्षणात नवीन विचारप्रवाहांचा समावेश** — बदलत्या काळानुसार व माहितीनुसार शिक्षणातही बदल होत आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्याच्या गरजा व अपेक्षा बदलत आहेत. विद्यार्थ्यांच्या बहुआयामी ज्ञानपातळी लक्षात घेता शिक्षणात नवीन विचारप्रवाह येत आहेत. उदा. पारंपारिक अध्यापन पद्धती ऐवजी ज्ञानरचनावाद, संगणक सहाय्यित अध्ययन तसेच मेंदू आधारित अध्ययन इत्यादीचा उपयोग करून अध्यापन करणे.

३ **.माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वाढता वापर** — आधुनिक समाजात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. त्यामुळे आजच्या शिक्षकांमध्ये तंत्रज्ञान वापरण्याचे कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे.उदा. आभसी वर्गाद्वारे (Virtual classroum) अध्यापन, ई—लर्निग, ३जी तंत्रज्ञानाचा (Technology) अध्यापनात वापर करण्याचे कौशल्य. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन पद्धतीतही बदल करणे आवश्यक आहे.

४. **गुणवत्तापूर्ण शिक्षणातील समस्या** — शिक्षकाचे शिक्षण गुणवत्तापूर्ण असायला हवे. परंतु काहीवेळेस गुणवत्तेची संकल्पना,

गुणवत्तेचे निष्कर्ष व गुणवत्तेमधील फरक याबाबत समस्या निर्माण झालेल्या दिसत आहे. अपेक्षित गुणवत्ता आणि प्रत्यक्ष गुणवत्ता यात फरक तफावत आढळतो.

५. **शिक्षक शिक्षण महाविद्यालयांची वाढती संख्या** — शिक्षक शिक्षण महाविद्यालयांची संख्या वाढत आहजे. परंतु प्रत्येक महाविद्यालयामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आवश्यक भौतिक सुविधा व मानवी घटक व आवश्यक इतर बाबी आहेतच असे नाही.

६. **शिक्षणाचे जागतिकीकरण** — शिक्षणाच्या जागतिकीकरणामुळे शिक्षण सर्वासाठी खुले झाले आहे. त्यामुळे आजच्या शिक्षकांची भाषा कौशल्य व जीवनकौशल्य विकसित करणे आवश्यक आहे.

७. **मूल्यशिक्षणची गरज** — आधुनिकीकरण व पाश्चात्यीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे समाजाची जीवनशैली बदलेली दिसून येते. नीतिमत्ता व मूल्यांची घसरण होताना दिसत आहे. परिणामी समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

बदलत्या समाजाच्या अपेक्षा व विद्यार्थ्याच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक कौशल्य आजच्या शिक्षकांमध्ये असणे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे आजच्या काळातील आव्हानांना सक्षमपणे यशस्वीरित्या सामोरे जाण्यासाठी परिपूर्ण शिक्षक घडविण्याची महत्वपूर्ण जबाबदारी शिक्षक शिक्षण महाविद्यालयांपुढे आहे.

## उपाय :—

१. आशय, अध्यापन पद्धत्ती, यांच्याबरोबर प्रशिक्षणार्थीमध्ये स्व.जाणीव, स्व. व्यवस्थापन, सामाजिक अनुभूती , व्यक्तीसंबंध यासारख्या भावनिक क्षमतांचा विकास व एकत्रिकरण कौशल्य विकसित करणे.

२. प्रशिक्षणार्थीमध्ये संभाषण कौशल्य, भाषा कौशल्य तसेच चिकित्सक विचार, सर्जनशीलता , निर्णयक्षमता, समस्या निराकरण कौशल्य आणि भावना व ताणाचे व्यवस्थापन करणे यासारख्या जीवनकौशल्यांचा विकास करणे.

३. आजच्या ज्ञानाधिष्ठित समाजात माहिती मिळविणे व त्यावर प्रक्रिया करणे, व तिचे ज्ञानात रूपांतर करणे हे कौशल्य प्रशिक्षणार्थीमध्ये विकसित करणे.

४. ई—लर्निग, आभासी वर्ग (Virtual classroom) यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रशिक्षणार्थीमध्ये तंत्रज्ञान व अध्यापनशास्त्रीय (Pedagogic) कौशल्यांचा विकास करणे.

५. Collaborative learning, Co-operative learning , ज्ञानरचनावाद यांचा प्रत्यक्ष अध्यापनात वापर करण्याचे कौशल्य प्रशिक्षणार्थीमध्ये विकसित करणे.

६. बी.एड अभ्यासक्रमातील शैक्षणिक संशोधन या वैकल्पिक विषयांतर्गात आणि शालेय व्यवस्थापन तत्वे व कार्यवाही या विषयांतर्गत येणा—या प्रात्यक्षिक कार्य अनुक्रमे संशोधन आराखडा व कृती संशोधन आराखडा तयार करणे यामध्ये नावीन्यपूर्ण व आजच्या शिक्षण पद्धतीत उपयुक्त अशा विषयांवर संशोधन होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशिक्षणार्थीना प्रोत्साहन देणे व आवश्यक ते मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

७. संशोधनामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे कौशल्य निर्माण करणे.
**उदा.** Technology enhancing Research (TER) , ICT as research instrument . त्यासाठी प्रक्रिया विश्लेषण उपागम इ.चा वापर करण्याचे कौशल्य निर्माण करणे.

- **अभ्यास क्रमाबाबत :—**

१. गतिमान समाजाचा वेध घेण्यासाठी भविष्याभ्यास शाश्वत विकासासाठी शिक्षण यासारख्या विषयाचा समावेश अभ्यासक्रमात करणे शक्य होईल.

२. प्रचलित अभ्यासक्रमातील शक्तिस्थाने (महिती संप्रेषण तंत्रज्ञान, अनुदेशन प्राणली, शैक्षणिक संशोधन,आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण शिक्षण) हे विषय कायम ठेवून त्यात काळानुरूप अद्ययावत माहिती देणे शक्य होईल.

३.शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम रचना करताना शालेय स्तरावरील संबंधित संस्थांना प्रतिनिधित्व असावे.

४.अभ्यासक्रम राबविताना पुरेसा कालावधी मिळावा

- **महाविद्यालयांसदर्भात** –

१.बी.एड अभ्यासक्रमांची कार्यवाही करणा–या महाविद्यालयांच्या सक्षमतेचे नियमित मूल्यमापन व्हावे.

२.शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये पूर्ण व्यावसायिक अर्हता प्राप्त प्राध्यापकांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

३.अभ्यासक्रमासाठी राबविल्या जाणा–या प्रवेश प्रक्रियेत प्रवेश परीक्षेबरोबर कल चाचणी आवश्यक ठेवावी.

४. अध्यापक महाविद्यालयांची संख्या मर्यादित करावी त्यासाठी NCTE व विद्यापीठ निकषांनुसार तपासणी करणे शक्य होईल.

गेली काही वर्ष शिक्षक शिक्षण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक प्रशिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कमीत कमी कालावधीत हा अभ्यासक्रम राबविणे अशक्य होते त्यामुळे कामात नाविन्यता येत नाही तर वर्षानुवर्षे चालत आलेल्या पध्दतीनुसार कार्यवाही केली जाते. यात बदल होणे आवश्यक आहे व त्यासाठीच अभ्यासक्रमात शिक्षक, विदयार्थी, भौतिक संसाधने व विविध उपक्रम यासंबधीत वेगवेगळे गुणवत्तापूर्ण संशोधन होणे गरजेचे आहे.